जा.क्र/मनपा/स्लम/२०१८/458

कार्यालय महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक :- 14 /०२/२०१८

# जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व नोंदणीकृत इच्छूक विकासक (BUILDERS) यांना जाहीर आवाहन करण्यात येते की "सर्वांसाठी घरे २०२२" संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजनेची (शहरी) अंमलबजावणी करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेकडून कार्यवाही चालू आहे. सदर योजनेबाबत महाराष्ट्र शासन निर्णय दि.९ डिसेंबर २०१५ आणि दि.११ जानेवारी २०१८ तसेच वेळोवेळी प्राप्त निर्णयानुसार चार मुद्द्यांपैकी मुद्दा क्र.०३ (Vertical No.03) नुसार विविध पात्र लाभार्थ्यांना सदनिका उपलब्ध करून देणे आहे. शासन निर्णय दि.११ जानेवारी २०१८ नुसार "प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) तत्वावरील प्रकल्पांसाठी निर्गमित केलेल्या प्रतिकृतींची (Model) राज्यात अंमलबजावणी" करण्याकरिता आपल्याकडे सद्यस्थितीमध्ये उपलब्ध असलेल्या योग्य जागा / भूखंड व योजनांच्या इतंभूत माहिती संबंधीत चर्चासत्र / बैठक आयोजित करण्यात आले असून या चर्चासत्रास मा.आयुक्त महोदय हे मार्गदर्शन करणार आहे. तरी सर्व नोंदणीकृत इच्छूक विकासकांनी दि.~~१५/०२/२०१८~~ 22/02/2018 रोजी सकाळी ११.३० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या आमखास मैदान जवळील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, येथे या चर्चासत्रास / बैठकीस इत:भुत माहितीसह उपस्थित रहावे, हि विनंती.

कार्यकारी अभियंता-१

तथा

कक्ष प्रमुख (PMAY)

महानगरपालिका, औरंगाबाद.

14/2/2018